Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

# विदर्भातील आरोग्य सोयी - सुविधा व मृत्यू दर : एक अध्ययन

**मोगल राजेंद्र नानाभाऊ**
संशोधक

**प्रस्तावना:**

मानव विकास म्हणजे मानवाच्या कार्यक्षमतेचा विकास होय. त्यात आरोग्य, सकस आहार,रोजगार, शिक्षण इ. बाबी अभिप्रेत आहेत. परंतु त्याचबरोबर प्रत्येक व्यक्तीला पिण्याचे शुध्द पाणी,चांगले शिक्षण, चांगले पर्यावरण, सुखी जीवन व चांगले आरोग्य आवश्यक मानले गेले आहे. २१ व्या शतकात तर चागंले आरोग्य हा अत्यंत महत्वपूर्ण घटक ठरला आहे. व्यक्तीचे आरोग्य ज्या बाबीवर अवलंबून असते; अशा घटकावर मागासलेपणाचा परिणाम होत असतो. पुरोगामी महाराष्ट्रात सार्वजनिक आरोग्याबाबत मोठ्या प्रमाणात विषमता आहे. विदर्भातील सार्वजनिक आरोग्यावर विसंबून असणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. अदिवासी विभाग तर मोठ्या प्रमाणात सार्वजनिक आरोग्य सेवावरच अवलंबून आहे. तसेच विदर्भातील ग्रामीण व शहरी भागातील सार्वजनिक आरोग्य सेवांमध्ये दरी असल्याचे मत व्यक्त होते.

विदर्भ हा महाराष्ट्राचा एक भाग आहे; विदर्भातील आरोग्य व्यवस्थेची स्थिती महाराष्ट्र किंवा भारतापेक्षा काही अंशी वेगळी आहे. सार्वजनिक आरोग्या बाबत बरेच मापदंड महाराष्ट्रामध्ये भारतातील इतर राज्यांच्या तुलनेत अधिक आहेत; असे असले तरीही महाराष्ट्राच्या इतर विभागापेक्षा विदर्भात ते काही अंशी कमी प्रमाणात आहेत. परंतु विदर्भातील बहुतांशी लोकसंख्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेवर अवलंबून आहे, त्यामुळे विदर्भातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचा अभ्यास करणे महत्वाचे आहे.

तक्ता क्र. १

**विदर्भातील जिल्हानिहाय आवश्यक व उपलब्ध प्राथमिक आरोग्य केंद्रे (२०११)**

| अ. क्र. | जिल्हा | एकूण आवश्यक प्राथमिक आरोग्य केंद्रे | उपलब्ध प्राथमिक आरोग्य केंद्रे | नवीन मंजुर झालेले प्राथमिक आरोग्य केंद्रे | एकूण | तुट |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अकोला | ३७ | ३० | १ | ३१ | ६ |
| २ | अमरावती | ६९ | ५६ | ५ | ६१ | ८ |
| ३ | भंडारा | ३२ | ३३ | ० | ३३ | ० |
| ४ | बुलढाणा | ६८ | ५२ | ५ | ५७ | ११ |
| ५ | चंद्रपूर | ५५ | ५८ | ५ | ६३ | ० |
| ६ | गडचिरोली | ३९ | ४५ | ४ | ४९ | ० |

| अ. क्र. | जिल्हा | एकूण आवश्यक प्राथमिक आरोग्य केंद्रे | उपलब्ध प्राथमिक आरोग्य केंद्रे | नवीन मंजुर झालेले प्राथमिक आरोग्य केंद्रे | एकूण | तुट |
|---|---|---|---|---|---|---|
| ७ | गोंदिया | ४१ | ३९ | ६ | ४५ | ० |
| ८ | नागपूर | ५९ | ४९ | ७ | ५६ | ३ |
| ९ | वर्धा | २९ | २७ | ५ | ३२ | ० |
| १० | वाशिम | ३३ | २५ | २ | २७ | ६ |
| ११ | यवतमाळ | ८२ | ६३ | १० | ७३ | ९ |
| विदर्भ | | **५४४** | **४७७** | **५०** | **५२७** | **१७** |
| महाराष्ट्र | | **२२१४** | **१८०९** | **२५४** | **२०६३** | **१५१** |

स्त्रोत :- महाराष्ट्राच्या समतोल प्रादेशिक विकासाच्या प्रश्नावरील उच्चस्तरीय समिता अहवाल - महाराष्ट्र शासन नियोजन विभाग (२०१३)

तक्ता क्र. १ मध्ये विदर्भातील जिल्हानिहाय आवश्यक व उपलब्ध प्राथमिक आरोग्य केंद्राची संख्या दर्शविण्यात आलेली आहे. यावरुन असे लक्षात येते की, २०११ च्या जनगणनेनुसार विदर्भात ५४४ एवढी प्राथमिक आरोग्य केंद्रे आवश्यक होती, परंतु प्रत्यक्षात ४७७ एवढी प्राथमिक आरोग्य केंद्रे उपलब्ध आहेत. त्यात नव्याने मंजुरी मिळालेली ५० प्राथमिक आरोग्य केंद्र आहेत, म्हणजेच विदर्भात एकूण ५२७ एवढी प्राथमिक आरोग्य केंद्र गृहीत धरल्यास १७ प्राथमिक आरोग्य केंद्राची कमतरता असल्याचे लक्षात येते. तसेच २०११ च्या जनजणनेनुसार महाराष्ट्रात १५१ प्राथमिक आरोग्य केंद्राची कमतरता असल्याचे निदर्शनास येते.

विदर्भातील जिल्हानिहाय प्राथमिक आरोग्य केंद्राच्या तुटीचा विचार केला असता बुलढाणा जिल्ह्यात ११ प्राथमिक आरोग्य केंद्राची कमतरता असून ती सर्वाधिक आहे; तर भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, आणि वर्धा या जिल्ह्यात लोकसंख्येच्या प्रमाणात प्राथमिक आरोग्य केंद्राची उपलब्धता आहे. परंतु अकोला, अमरावती, नागपूर, वाशिम व यवतमाळ या जिल्ह्यात अनुक्रमे ०६,०८,०३,०६ व ०९ एवढ्या प्राथमिक आरोग्य केंद्राची कमतरता आहे तर नवीन प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या मंजुरीमुळे भंडारा, चंद्रपुर, गडचिरोली, गोंदिया व वर्धा या जिल्ह्यात अनुक्रमे १, ८, १०, ४ व ३ एवढी आवश्यकतेपेक्षा अधिक प्राथमिक आरोग्य केंद्रे आहेत.

तक्ता क्र. २

**विदर्भातील जिल्हा निहाय प्रतिलाख लोकसंख्ये मागे खाटांचे प्रमाण (२०११)**

| अ. क्र. | जिल्हा | प्रति लाख लोकसंख्ये मागे खाटांचे प्रमाण |
|---|---|---|
| १ | अकोला | १५१ |
| २ | अमरावती | १६८ |
| ३ | भंडारा | १३५ |
| ४ | बुलढाणा | ८१ |
| ५ | चंद्रपूर | १०७ |
| ६ | गडचिरोली | ४६ |
| ७ | गोंदिया | ४८ |
| ८ | नागपूर | २०४ |
| ९ | वर्धा | ११३ |
| १० | वाशिम | ४४ |
| ११ | यवतमाळ | ७१ |
| विदर्भ | | **१५६** |
| महाराष्ट्र | | **१८४** |

स्त्रोत:- अर्थ व सांख्यिकीय संचालनालय, महाराष्ट्र शासन - मुंबई

तक्ता क्र. २ मध्ये विदर्भातील जिल्हा निहाय प्रतिलाख लोकसंख्ये मागे उपलब्ध असणाऱ्या खाटांचे प्रमाण दर्शविण्यात आले आहे. महाराष्ट्रात प्रतिलाख लोकसंख्ये मागे खाटांचे प्रमाण हे १८४ एवढे आहे. जे विदर्भाच्या (१५६) तुलनेत अधिक आहे. नागपूर जिल्ह्यात प्रतिलाख लोकसंख्ये मागे २०४ खाटांची संख्या आहे, जी सर्वाधिक आहे. परंतु वाशिम जिल्ह्यात प्रतिलाख लोकसंख्येमागे खाटांची संख्या ही ४४ एवढी असून सर्वात कमी आहे. नागपूर जिल्ह्यातील प्रतिलाख लोकसंख्ये मागे खाटांची संख्या (२०४) ही विदर्भ आणि महाराष्ट्रातील खाटांच्या संख्येपेक्षा देखील जास्त आहे. शंभर पेक्षा जास्त खाटांची संख्या असणाऱ्या जिल्ह्यात अकोला, अमरावती,भंडारा, चंद्रपूर, नागपूर व वर्धा या जिल्ह्याचा समावेश होतो. तर शंभर पेक्षा कमी खाटांची संख्या असणाऱ्या जिल्ह्यात गडचिरोली, गोंदिया, वाशिम व यवतमाळ ही जिल्हे येतात.

Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

तक्ता क्र. ३

**विदर्भातील जिल्हानिहाय माता मृत्यु प्रमाण (२०११)**

| अ. क्र. | जिल्हा | माता मृत्यु प्रमाण (प्रति लाख प्रसूतीनुसार) |
|---|---|---|
| १ | अकोला | १६१.० |
| २ | अमरावती | १२३.० |
| ३ | भंडारा | ९२.० |
| ४ | बुलढाणा | २९.० |
| ५ | चंद्रपूर | १०२.२ |
| ६ | गडचिरोली | १८४.० |
| ७ | गोंदिया | ५७.० |
| ८ | नागपूर | १७८.० |
| ९ | वर्धा | ७७.० |
| १० | वाशिम | १५.० |
| ११ | यवतमाळ | ८७.० |
| विदर्भ | | **१०८.०** |
| महाराष्ट्र | | **९०.०** |

स्त्रोत:- एम. आय. एस. आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन

तक्ता क्र. १.३ मध्ये विदर्भातील जिल्हानिहाय प्रतिलाख प्रसूतीनुसार माता मृत्यु प्रमाणाची स्थिती दर्शविण्यात आली आहे. त्यावरुन असे लक्षात येते की, महाराष्ट्रात प्रति लाख प्रसूती मागे ९० माता या मृत्यु होतात. परंतु विदर्भातील माता मृत्यु प्रमाणाची संख्या १०८ एवढी असून महाराष्ट्राच्या तुलनेत ती अधिक आहे. याचा अर्थ असा की, महाराष्ट्राच्या तुलनेत विदर्भात गरोदर मातांच्या संगोपणासाठी असणाऱ्या सुविधांचा अभाव आहे असे म्हणता येते.

विदर्भातील जिल्हानिहाय प्रतिलाख प्रसुतीनुसार माता मृत्यु प्रमाणाची स्थिती अभ्यासली असता; गडचिरोली जिल्ह्यात १८४ एवढ्या माता मृत्यु होतात, हे प्रमाण सर्वाधिक आहे. तर सर्वात कमी माता मृत्यु प्रमाण १५ एवढे वाशिम जिल्ह्याचे आहे. तसेच विदर्भातील अकोला (१६१), अमरावती (१२३), गडचिरोली (१८४), नागपूर (१७८), या जिल्ह्यातील माता मृत्यु प्रमाण हे विदर्भ आणि महाराष्ट्राच्या मातामृत्यु प्रमाणापेक्षा अधिक आहे. म्हणजेच सदरील जिल्ह्यात गरोदर माता संगोपन सुविधा मध्ये वाढ करणे गरजेचे आहे.

तक्ता क्र. ४

**विदर्भातील जिल्हानिहाय अर्भक मृत्यु प्रमाण (२०११)**

| अ. क्र. | जिल्हा | अर्भक मृत्यु संख्या प्रमाण |
|---|---|---|
| १ | अकोला | २९.२ |
| २ | अमरावती | ४६.५ |
| ३ | भंडारा | ४०.८ |
| ४ | बुलढाणा | ३४.७ |
| ५ | चंद्रपूर | ५२.२ |
| ६ | गडचिरोली | ४७.५ |
| ७ | गोंदिया | ४५.२ |
| ८ | नागपूर | ३३.५ |
| ९ | वर्धा | ३९.२ |
| १० | वाशिम | ३२.९ |
| ११ | यवतमाळ | ४०.१ |
| विदर्भ | | ३९.५ |
| महाराष्ट्र | | ३१.२ |

स्त्रोत :- जिल्हा स्तरीय कुटुंब सर्वेक्षण (DL HS)

तक्ता क्र. ४ मध्ये विदर्भातील जिल्हा निहाय अर्भक मृत्यु प्रमाण दर्शविण्यात आले आहे. २०११ च्या आकडेवारी नुसार महाराष्ट्रातील अर्भक मृत्युचे प्रमाण ३१.२ एवढे आहे. जे विदर्भातील अर्भक मृत्यु दराच्या प्रमाणापेक्षा कमी आहे. विदर्भातील जिल्हा निहाय अर्भक मृत्यु दराच्या प्रमाणाचा विचार केला असता असे लक्षात येते की, चंद्रपूर जिल्ह्यात अर्भक मृत्यु दराचे प्रमाण ५२.२ एवढे असून ते सर्वाधिक आहे. तर अकोला जिल्ह्यात २९.२ एवढे अर्भक मृत्यु प्रमाण असून हे सर्वात कमी आहे.

**संदर्भ :**

१. कुंभार दत्तात्रय डी. (२०१३): आपला जिल्हा बुलढाणा, चक्रपाणी प्रकाशन, सातारा.
२. जगन्नाथ दीक्षीत (२०००) : आरोग्य धन, मनोविकास प्रकाशन,मुंबई
३. भारती दिपक (२०११): 'लोकसंख्या अध्ययन' चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद
४. महाराष्ट्र शासन - महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अहवाल (२००४-०५ ते २०१४).
५. रुद्र दत्त व सुंदरम (२००४): भारतीय अर्थव्यवस्था, एस. चंद पब्लिकेशन, दिल्ली.
६. देशमुख प्रशांत (२०१६) :- ''मराठवाडा गती - प्रगती'' चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.